**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

नगरसचिव कार्यालय दिनांक - ३०/०६/२०२३

प्रति,
मा. ---------------------------------------
स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.०४ मंगळवार दि.०४/०७/२०२३ रोजी दुपारी-१:०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत येथील **मा.स्थायी समिती सभागृह, अहमदनगर या कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण प्रत्यक्ष उपस्थीतीने सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-
(एस.बी.तडवी)
नगरसचिव
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**मंगळवार दि.०४/०७/२०२३ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ३८ | अर्जदार बद्रिनाथ निवृत्ती घोडके व रामेश्वर निवृत्ती घोडके रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं.१) z४२८११०६४२ व २) z४२८०००२८५ या दोन ओपन प्लॉट चे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. z४२८११०६४२ हे एक बिल रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३९ | अर्जदार सौ.सुजाता राजकुमार चोभे रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं. z४२८११०३२३ वर बांधकाम झालेले आहे व z४२८११०५८७ या एका मिळकत ही मोकळी जागा असुन हे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. z४२८११०५८७ ह्या बिलावरील रक्कम+शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४० | अर्जदार श्री.सुनिल एकनाथ गाडळकर, रा.मल्हार चौक,स्टेशन रोड, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२४ मधील (बिल क्र.Z४२४१०७६७३) पाणी पट्टीचे बिल कमी करुन रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४१ | श्री. परेश रामविलास झंवर, रा.केडगांव इंडइस्टेट यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २०२२-२०२३ अखेर ( वॉर्ड क्र.२४ बील क्रमांक Z४२४००००३३३) पाणीपटटी रूपये ९९४००/- व २% दंडात्मक शास्ती १०५२४१/- अशी एकुण रु.२०४६४१/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ४२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.३ हा अनाथ निराधार, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक व विदयार्थीसाठी यशस्वीरित्या काम करणारी संस्था हेल्पिंग हॅडस युथ फौडेशन या संस्थेच्या सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा आरोग्य कामाकरिता इमारत खोली नामनात्र दरामध्ये मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४३ | अहमद्नगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील दैनंदिन कचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणाकरिता खाजगी संस्थेची नेमणूक करणेकामी दर निश्चित करुन संस्था नियुक्त करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४४ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृह रुग्णांकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी आहारतज्ञांची प्रति दिन मानधन प्रमाणे पॅनल शिपवर नेमणूक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४५ | अहमद्नगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम व आकृतीबध सुधारणा,दुरुस्ती व नवीन पदे निर्माण करण्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४६ | अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी डॉ. सौ. रेणुका प्रणव जोशी यांची यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ४७ | अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४८ | अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील नेमलेल्या सेवानिवृत्त अभियंता विजयशंकर तिवारी यांना तीन दिवसांचा तांत्रिक कालखंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४९ | अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवे साठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वाहनचालक यापदी ओंकार राजेंद्र सैंदाणे व प्रशांत सिकंदर वाकरे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५० | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १.सौ.शितल गंगाराम शिंदे २.सौ.तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत. |
| ५१ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षेत्रिय यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत. |
| ५२ | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर ७ यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ५३ | अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागाकरिता श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची कनिष्ठ अभियंता(ऑटो मोबाईल इंजिनियर) या पदी अटी व शर्ती नुसार कंत्राटी करार पध्दतीने पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
(एस.बी.तडवी)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत** - विषय क्रमांक- ३८ ते ५३ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक - ३८** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार बद्रिनाथ निवृत्ती घोडके व रामेश्वर निवृत्ती घोडके रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं.१) Z४२८११०६४२ व २) Z४२८०००२८५ या दोन ओपन प्लॉट चे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. Z४२८११०६४२ हे एक बिल रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरुडगाव विभाग.
संदर्भ:- दि-०६/०७/२०२२ रोजीचा अर्ज.

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, बद्रिनाथ निवृत्ती घोडके व रामेश्वर निवृत्ती घोडके राहणार चिपाडेमळा सारसनगर यांनी इकडेस अर्ज देऊन कळविले की, त्यांचे एकाच मालमत्तेचे दोन घरपट्टीचे बिले येत आहेत. परंतु मालमत्ता एकच आहे. तरी माझे मालमत्तेची झालेली डबल नोंदीची संगणकात दुरुस्ती करावी आणि दोन बिलापैकी एक बिल रद्द करावे या प्रमाणे अर्ज दिलेला आहे.

बद्रिनाथ निवृत्ती घोडके व रामेश्वर निवृत्ती घोडके यांचे मालमत्तेची नोंद वॉर्ड नं.२८ मध्ये असुन त्यांचे बिल नंबर अनुक्रमे १) Z४२८११०६४२ व २) Z४२८०००२८५ या प्रमाणे दोन मालमत्तांची ओपन प्लॉट म्हणून नोंद आहे. अर्जदाराचे अर्जानुसार सदरील जागेची समक्ष पहाणी केली असता अर्जदाराची एकच मिळकत असल्याचे निर्दशनास आलेले आहे. म.न.पा.चे मालमत्ता रजिष्टरला नजर चुकीने दोन मिळकतींची नोंद झालेली आहे. सदर दोन्ही मिळकतीचे करयोग्य मुल्य ११४७ आहे. अर्जदाराने दोन्ही मिळकती पैकी बिल नं. Z४२८०००२८५ वरील मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा केलेला आहे.

प्रत्यक्ष पहाणी अहवालात एकच मिळकत ओपन प्लॉट असल्याने बिल नं. Z४२८०००२८५ हे बिल तसेच ठेवून झालेल्या डबल नोंदीचे बिल नं. Z४२८११०६४२ हे रद्द होणेस तसेच सदर बिलावरील सन २०२२-२०२३ अखेर मालमत्ता कर व इतर कराची एकुण थकबाकी रक्कम रु.१५९९३/- ही शास्ती सह वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र प्रांतिक म.न.पा.अधिनियम १५२ अन्वये निर्लीखीत करणेस मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.
येणे प्रमाणे वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचा अहवाल असे.
यावर मा.प्र.प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, वसुली लिपीक, कर निरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच अर्जदाराचे अर्जनुसार महाराष्ट्र प्रांतिक म.न.पा.अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये संबंधित मालमत्ताधारकाची झालेली डबल नोंद रद्द करुन थकबाकी रक्कम रुपये १५९९३+ शास्ती निर्लेखित करण्यासाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.
यावर मा.प्र.सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की, मा.प्रभाग अधिकारी यांनी सादर केलेआ प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणे योग्य होईल तथापि आदेशार्थ सादर.
यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावितप्रमाणे निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अर्जदार बद्रिनाथ निवृत्ती घोडके व रामेश्वर निवृत्ती घोडके रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं.१) Z४२८११०६४२ व २) Z४२८०००२८५ या दोन ओपन प्लॉट चे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. Z४२८११०६४२ हे एक बिल रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.सुनिल त्र्यंबकेः- सभागृह नेता तथा सदस्य स्थायी समिती मा.श्री.विनीत पाउलबुधे यांचे पत्नीचे तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे ठेकेदार रसिक कोठारी यांचे निधन झालेले आहे. प्रथम त्यांना स्थायी समिती तर्फे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा.सभापती साहेब- माझे मित्र सभागृह नेता तथा सदस्य स्थायी समिती मा.श्री.विनीत पाउलबुधे यांचे पत्नीचे तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे ठेकेदार रसिक कोठारी यांचे निधन झालेले आहे. मी व माझे कुटुंबीय, तसेच स्थायी समितीचे सर्व सदस्य आणि अधिकारी, कर्मचारी त्यांच्या दुखामध्ये सहभागी असुन त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.

२ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

मा.श्री.सपत दादा बारस्कर :- प्रभागामधील किरकोळ कामे करण्यास ठेकेदार तयार होत नाहीत. म.न.पा. ही किरकोळ कामे करीत नाही. ठेकेदार काम का करीत नाही विचारले तर मनपामधुन आमचे बिले निघत नसल्यामुळे आम्ही कामे करीत नाही. वॉर्डातील किरकोळ किरकोळ कामाकरीता नगरसेवक निधी रोख स्वरुपात करण्यात यावा. या विषयाबाबत अनेक वेळा मा.स्थायी समिती सभेमध्ये चर्चा घडून आलेल्या आहेत. परंतु आज पर्यंत प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.सभेमध्ये आपण येतो चर्चा करतो नंतर प्रशासन त्यावर काहीही कार्यवाही करीत नाही. नगरसेवक निधी रोख स्वरुपात झाला नाहीतर मी पुढील स्थायी समितीच्या वेळी खाली बसुन घेईल. माझ्याबरोबर ज्या नगरसेवकांना सहभागी व्हायचे असेल तर होऊ शकता. प्रशासना तर्फे कोणीतरी माहिती द्या.

मा.उपायुक्त श्री.कुरे साहेब- विभागाच्या प्रस्तावानुसार बजेट नोंदवुन त्यानुसार विषय येत असतात. काम पुर्ण झाल्यानंतर बिल तयार करुन लेखा विभागाकडे पाठविण्यात येते. बिलाची लेखार्शिष व त्यामध्ये असणारा शिल्लक निधी याची पहाणी करुन त्यानुसार बिले अदा केली जातात. प्राप्त निधी व त्याचे नियोजन हे लेखा विभागामार्फत केले जाते.

मा.श्री.शेख मुदस्सर- मा.आयुक्त साहेब यांना विनंती करुन त्यांच्या सहीने लेखा विभागास बिले काढण्याबाबत पत्र देण्यात यावे.

मा.श्री.संपत बारस्कर- नगरसेवक निधी यातील बिले देता येत नसतील तर बजेटमध्ये या निधीची तरतुत करण्यात येवु नये. खर्ची न पडणारा निधी बजेट मध्ये दर्शवुन बजेट फुगविले जाते.

मा.सभापती साहेब- नगरसेवक निधीतील कामे कोणताही ठेकेदार तयार होत नाही. नागरिकांच्या खुप तक्रारी येतात. किरकोळ कामांचे बिले तातडीने निघणे आवश्यक आहे. पावसाळ्याचे दिवस सुरु झालेले असल्याने रस्त्यावर पॅचिंग करणे आवश्यक आहे. मुरुम मागणी करुन ही मिळत नाही.

शहर अभियंता श्री.पारखे- पॅचिंगचे कामे चालु केलेले आहे.

मा.श्री.संपत बारस्कर- पावसाळा सुरु झाले तरी मागिल मिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे ज्याठिकाणी नाल्यावर पाईप टाकुण नाले बंद केलेले आहेत ते पाईप काढले गेलेले नाहीत. पाऊस झाल्यानंतर पुन्हा मागिलनुसारच परिस्थिती होणार आहे.

नगररचनाकार श्री. चारठाणकर- नाल्यावरील पाईप काढण्याचे काम चालु आहे. दि.१० पर्यंत पाईप काढतो.

अतिरिक्त आयुक्त श्री.पठारे साहेब- कर्मचा-यामार्फत नाले सफाईचे काम बंद आहेत. सदर ठेकेदाराचा ठेका संपल्याने काम बंद होते. दोन दिवसात वर्क ऑर्डर देवुन काम सुरु करु. प्रथम त्या ठेकेदारास १ महिन्याचे काम देवुन पाहू. त्यांचे काम समाधान वाटल्यास नंतर कालावधी वाढविण्यात येईल.

मा.सभापती साहेब- थकीत देयका बरोबर चालु वर्षाच्या नगरसेवक निधी मधील बिले काढा.

मा.श्री.संपत बारस्कर- नगरसेवक निधी रोख स्वरुपात करणेबाबत महासभेपुढे विषय घ्या. तेथे ही आपण आपले मत मांडु.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे साहेब- महानगरपालिकेची आजची आर्थिक परिस्थिती पहाता जमेची बाजू कमकुवत आहे. काही निधी मधुन बिले देण्याकरीता पैसे नसतात. आर्थिक परिस्थिती सुधारली तर निधी रोख स्वरुपात करता येईल.

मा.श्री.प्रदिप परदेशी :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- प्रभाग अधिकारी श्री.नाना गोसावी या विषयाची माहिती सांगा.

प्रभाग अधिकारी श्री.नाना गोसावीः- संबंधित मालमत्ताधारकाची झालेली डबल नोंद रद्द करुन थकबाकी रक्कम व शास्ती निर्लेखित करण्यासाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यत आला आहे.

मा.श्री.प्रदिप परदेशी :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.शेख मुदस्सर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेबः- अर्जदार बद्रिनाथ निवृत्ती घोडके व रामेश्वर निवृत्ती घोडके रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं.१) z४२८११०६४२ व २) z४२८०००२८५ या दोन ओपन प्लॉट चे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. z४२८११०६४२ हे एक बिल रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

विषय क्रमांक ३८ ते ४१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

ठरावः- ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार बद्रिनाथ निवृत्ती घोडके व रामेश्वर निवृत्ती घोडके रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं.१) z४२८११०६४२ व २) z४२८०००२८५ या दोन ओपन प्लॉट चे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. z४२८११०६४२ हे एक बिल रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

विषय क्रमांक ३८ ते ४१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रदिप परदेशी - सही/-

अनुमोदकः- मा.श्री.शेख मुदस्सर - सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक - ३९** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सौ.सुजाता राजकुमार चोभे रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं. z४२८११०३२३ वर बांधकाम झालेले आहे व z४२८११०५८७ या एका मिळकत ही मोकळी जागा असुन हे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. z४२८११०५८७ ह्या बिलावरील रक्कम+शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरुडगाव विभाग.
संदर्भ:- दि-२०/०७/२०२२ रोजीचा अर्ज.

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्र.२८ चे वसुली लिपीक यांचकडून देण्यात येतो की, सौ.सुजाता राजकुमार चोभे राहणार चिपाडे मळा सारसनगर यांनी इकडेस अर्ज देऊन कळविले कि श्री.सुभाष रामचंद्र ढवाण यांचेकडून बांधकाम झालेले घर विकत घेतले असुन त्याचे घरपट्टीचे बिल येत आहे व त्याच मिळकतीचे ओपन प्लॉटचे अतिरिक्त बिल येत आहे. परंतु मालमत्ता एकच आहे. तरी माझे मालमत्तेची झालेली डबल नोंदीची संगणकात दुरुस्ती करावी आणि दोन बिलापैकी एक बिल रद्द करावे या प्रमाणे अर्ज दिलेला आहे.

अर्जदाराचे अर्जानुसार सदरील जागेची समक्ष पहाणी केली असता अर्जदाराची एकच मिळकत असल्याचे अल्याचे निदर्शनास आलेले आहे. म.न.पा.चे मालमत्ता रजिष्टरला नजर चुकीने दोन मिळकतीची नोंद झालेली आहे. अर्जदाराने दोन्ही मिळकती पैकी बिल नं. Z४२८११०३२३ वरील मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा केलेला आहे. सदर अर्जदार यांच्या कागदपत्राची पाहणी केली असता श्री.सुभाष रामचंद्र ढवाण यांच्या नावावर प्लॉट नं ५ च्या बिल नंबर z४२८११०५८७ व Z४२८०००३२३ अशा दोन नोंदी असल्याचे दिसुन येते सदर अर्जदार यांनी बिल नंबर Z४२८०००३२३ वरील बांधकाम झालेली मिळकत खरेदी करुन म.न.पा.मालमत्ता कर रजिष्टरला मालमत्ता हस्तांतरण प्रक्रीया अर्ज देऊन तसेच नियमानुसार हस्तांतरण फी भरुन म.न.पा.ला नावाची नोंद केलेली आहे. परंतु त्याच मिळकतीचे जुने मालक श्री.सुभाष रामचंद्र ढवाण यांच्या नावाने ओपन प्लॉटचे बिल नंबर z४२८११०५८७ हे अतिरिक्त बिल येत आहे.

प्रत्यक्ष पहाणी अहवालात एकच मिळकत असल्याने बिल नं. Z४२८११०३२३ हे बिल तसेच ठेवुन झालेल्या डबल नोंदीचे बिल नं. Z४२८११०५८७ हे शास्ती सह रद्द होणेस तसेच सदर बिलावरील सन २०२२-२०२३ अखेर मालमत्ता कर व इतर कराची एकुण थकबाकी रक्कम रु.९४३२०/- ही शास्ती सह वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र प्रांतिक म.न.पा. अधिनियम १५२ अन्वये निर्लीखीत करणेस मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.
येणे प्रमाणे लिपील व कर निरीक्षक यांचा अहवाल असे.
यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, वसुली लिपीक, कर निरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच अर्जदाराचे अर्जानुसार महाराष्ट्र प्रांतीक म.न.पा.अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये संबंधित मालमत्ता धारकाची झालेली डब्ल नोंद रद्द करुन थकबाकी रक्कम रुपये ९४३२०+शास्ती निर्लेखित करण्यासाठी मा.स्थायी समिती पुढ़े ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.
यावर मा.सहाय्यक मुल्यनिर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, सादर प्रस्तावानुसार एकाच मालमत्तेची डबल नोंद झालेचे दिसुन येते. त्याचे बिल नं.अनुक्रमे Z४२८११०३२३ व z४२८११०५८७ या प्रमाणे आहे. बिल नं. Z४२८११०३२३ वर बांधकाम क्षेत्रफळानुसार कर आकारणी असून त्या कर आकारणीचा भरणा सन २०२२-२०२३ अखेर केलेला आहे. सबब डबल झालेली बिल नं. z४२८११०५८७ ही मिळकतीची सन २०२२/२३ अखेर रु.९४३२०/- हे वसुल न होणारे असल्याने निर्लेखित कामी कलम १५२ न्वये मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस

तसेच सदर रक्कम निर्लेखित होईपर्यंत होणारे २% दंडात्मक शास्तीची रक्कम कमी करणे बाबत नियम ५१ न्वये मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित प्रमाणे निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अर्जदार सौ.सुजाता राजकुमार चोभे रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं. Z४२८११०३२३ वर बांधकाम झालेले आहे व Z४२८११०५८७ या एका मिळकत ही मोकळी जागा असुन हे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. Z४२८११०५८७ ह्या बिलावरील रक्कम+शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.प्रदिप परदेशी :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.प्रदिप परदेशी :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.शेख मुदस्सर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेबः- अर्जदार सौ.सुजाता राजकुमार चोभे रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं. Z४२८११०३२३ वर बांधकाम झालेले आहे व Z४२८११०५८७ या एका मिळकत ही मोकळी जागा असुन हे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. Z४२८११०५८७ ह्या बिलावरील रक्कम+शास्ती निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

विषय क्रमांक ३८ ते ४१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

ठरावः- ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार सौ.सुजाता राजकुमार चोभे रा.चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२८ मधील मिळकत असल्याने बिल नं. Z४२८११०३२३ वर बांधकाम झालेले आहे व Z४२८११०५८७ या एका मिळकत ही मोकळी जागा असुन हे बिल डबल झालेल्या नोंदी पैकी मालमत्ता क्र. Z४२८११०५८७ ह्या बिलावरील रक्कम+शास्ती निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

विषय क्रमांक ३८ ते ४१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रदिप परदेशी - सही/-

अनुमोदकः- मा.श्री.शेख मुदस्सर - सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक - ४०** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.सुनिल एकनाथ गाडळकर, रा.मल्हार चौक,स्टेशन रोड, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२४ मधील (बिल क्र.Z४२४१०७६७३) पाणी पट्टीचे बिल कमी करुन रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरुडगाव विभाग.

प्रभाग समिती बुरुडगाव यांच्या कार्यक्षेत्रा मधील मालमत्ताकर संकलन वॉर्ड नं. २४ मधील कर पात्र मिळकत धारक सुनिल एकनाथ गाडीळकर मालमत्ता क्र. Z४२४१०७६७३ यांनी दि.९/७/२०२२ रोजी विनंती अर्जान्वये कळविले आहे की माझे कराच्या बिला मध्ये १/२ इंची तीन नळ कनेक्शन असल्याचे रहिवास दराने पाणी पट्टी ही चुकीची येत असल्याने ती बिला मधील दुरुस्ती करुन दयावी असे कळविले आहे.

उपरोक्त प्रकरणी नळ जोडणी विभागातील प्रभाग समितीच्या कार्याक्षेत्रात असणा-या अर्जान्वये मिळकती व म्यु.पल पाणी पुरवठा फिटर यांनी समक्ष स्थळ पाहणी करुन दि-९/९/२०२२ अन्वये अहवालाने सदरील मिळकतीच्या वापरत असणरे १/२ इंची दोन नळ कनेक्शन असल्या बाबत कळविले आहे. त्या ठिकाणी तीसरे नळ कनेक्शन असल्या बाबत कळविले आहे त्या ठिकाणी कनेक्शन नाही असे अहवाल सादर केला आहे.

सबब वरील प्रकरणी मालमत्ता कर पात्र धारक यांनी मालमत्ता कर पात्र धारक यांनी मालमत्ता करामधील बिल मध्ये पाणी नळजोडणी तीन नळ असल्याने रहिवास वापरातील चुकीचे देयक बिल येत असल्याने सदरील नळ कनेक्शन १/२ इंची ती नसुन दोन असल्याने सदरील मिळकतीवरचे एक नळ कनेक्शनची थकबाकी सन २०२२/२०२३ रक्कम रु.४५००/- शिल्लक असल्याने सदर मिळकतीवरचे थकबाकी ही निर्लीखित करण्यात महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये मा.स्थायी समिती पुढे मान्यतेस ठेवणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे लिपीक व कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर मा.प्र.प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक व करनिरीक्षक यांनी प्रस्तावित केलेनुसार मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर प्र.सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक यांचा अभिप्राय की, सादर प्रस्ताव व म्यु.पल फिटर श्री.शकील यांचे समक्ष स्थळ पाहणी अहवालानुसार अर्जदाराचे मिळकतीत १/२" दोन नळ कनेक्शन हे पिण्याचे वापरासाठी घेतले बाबत निदर्शनात आले. सबब अर्जदाराचे अर्जानुसार सन २०२२/२३ पासुन मालमत्ता कराचे बिलात दर्शवलेली तीन १/२" नळ कनेक्शन ऐवजी दोन १/२" नळ कनेक्शनची पाणीपट्टी आकार्णे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित 'अ' प्रमाणे रक्कम रु.४५००/- निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, आदेशार्थ का?

यावर वसुली लिपीक/करनिरीक्षक व प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, **फेरसादर** केले.

उपरोक्त प्रकरणी प्रभाग समिती कार्यालय चार येथील पाणी पुरवठा विभागामधील नळ जोडणी विभागातील फिटर यांनी समक्ष पहाणी केली असता त्या ठिकाणी १/२" दोन नळ कनेक्शन असले बाबत निदर्शनास आले आसल्याने सदरील मिळकतीवर वापरात आसणारे तिसरे नळ जोडणी कनेक्शन असल्याने सदरील बिला मधील १/२" दोन असल्यास बाबतची नळजोडणीची आकारणी कायम ठेवून तिसरी नळ कनेक्शन आसल्या बाबतची दाखल नोंद रद्दकरुन सदरील करपात्र मिळकत धारकास सुधारीत नळ जोडणी १/२" दोन आसल्या बाबतचे बिल देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४८५(१) नुसार दुरुस्ती बिल देणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावितप्रमाणे मा.स्थायी समितीकडे मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेब:- अर्जदार श्री.सुनिल एकनाथ गाडळकर, रा.मल्हार चौक,स्टेशन रोड, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२४ मधील (बिल क्र.Z४२४१०७६७३) पाणी पट्टीचे बिल कमी करुन रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.प्रदिप परदेशी :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.प्रदिप परदेशी :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.शेख मुदस्सर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब:- अर्जदार श्री.सुनिल एकनाथ गाडळकर, रा.मल्हार चौक,स्टेशन रोड, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२४ मधील (बिल क्र.Z४२४१०७६७३) पाणी पट्टीचे बिल कमी करुन रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

विषय क्रमांक ३८ ते ४१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

ठराव:- ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.सुनिल एकनाथ गाडळकर, रा.मल्हार चौक,स्टेशन रोड, अहमदनगर प्रभाग क्र.४ वॉर्ड क्र.२४ मधील (बिल क्र.Z४२४१०७६७३) पाणी पट्टीचे बिल कमी करुन रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

विषय क्रमांक ३८ ते ४१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रदिप परदेशी - सही/-

अनुमोदक:- मा.श्री.शेख मुदस्सर - सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

---

**विषय क्रमांक - ४१** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. परेश रामविलास झंवर, रा.केडगांव इंडइस्टेट यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २०२२-२०२३ अखेर ( वॉर्ड क्र.२४ बील क्रमांक Z४२४००००३३३) पाणीपटटी रूपये ९९४००/- व २% दंडात्मक शास्ती १०५२४१/- अशी एकुण रु.२०४६४१/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरुडगाव विभाग.

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, श्री.परेश रामविलास झंवर रा.केडगाव इंडइस्टेट यांनी इकडेस अर्ज देऊन कळविले की त्यांचे केडगाव इंड इस्टेट नगर पुणे रोड येथे मिळकत आहे. सदर ठिकाणी आठ वर्षा पुर्वी फेज २ पाणी कनेक्शनची लाईन टाकणेत आली त्यामुळे जुनी पाण्याची लाईन बंद करणेत आली. नवीन टाकलेल्या फेज २ लाईन वरुन मी नळकनेक्शन घेतलेले नाही माझे कडे नळ कनेक्शन नसताना देखील पाणीपट्टी बिल येत आहे. तरी माझी पाणीपट्टी कमी करावी या प्रमाणे अर्ज दिलेला आहे.

अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या मिळकतीची नोंद मालमत्ताकर वसुली वॉर्ड नं २४ मध्ये असुन त्याचा बिल क्र. Z४२४०००३३३ आहे. सदर मालमत्तेवर जुने २०२३ अखेर मुळ पाणीपट्टी रक्कम रु.९९४००/- व २% दंडात्मक शास्ती १०५२४१ अशी एकुण रु.२०४६४१/- ऐवढी थकबाकी आहे. अर्जदाराचे अर्जानुसार म्यु.पल फिटर यांनी समक्ष पाहणी केली असता त्यांनी सदर मिळकतीत नळ कनेक्शन आढलेले नाही. या प्रमाणे लेखी दिलेले आहे. म्यु.पल फिटर यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर ठिकाणी सन २०१७ साली फेज २ ची नवीन पाण्याची लाईन टाकलेली आहे. संबंधित मिळकतीत वार्षिक पाणीपट्टी रु.१००००/- ऐवढी आहे.

म्यु.पल फिटर यांचे पाहणी अहवालानुसार संबंधित मिळकत धारकांनी फेज २चे नवीन लाईन वरुन नळ कनेक्शन घेतलेले नाही. तसेच म्यु.पल फिटर यांनी सदर मिळकतीत नळ कनेक्शन घेतलेले नाही. असा लेखी अहवाल दिलेला आहे. सबब सदर मिळकतीत नळ कनेक्शन नसल्याने सन २०१७/२०१८ ते २०२२/२०२३ अखेर पाणीपट्टीची रक्कम रु.६००००/- वउल न होणारे असल्याने महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील कलम १५२ न्वये निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे वाबत तसेच सदरील वसुल न होणा-या रक्कमेवरील २% दंडात्मक शास्ती ही महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील अनुसची ३ प्रकरण ८ कराधान नियम ५१ न्वये कमी होणे बाबत आदेशार्थ सादर./'अ'.

येणे प्रमाणे लिपीक व कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्र.प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक व करनिरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच म्यु.पल फिटर यांचे समक्ष पाहणी अहवालानुसार अधिनियमातील तरतुदीनुसार दुरुस्त बिल देणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर प्र.सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक यांचा अभिप्राय की, म्यु.पल फिटर यांचे पाहणी अहवालानुसार सदर मिळकतीमध्ये नळ कने.आढळून आले नाही. तरी विभागाने सादर केलेला प्रस्ताव 'अ'नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.सहा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विहीत नमुन्यातील स्थळ पंचनामा सादर करा.

यावर वसुली लिपीक/करनिरीक्षक व प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, **फेरसादर** केले.

सोबत स्थळ पंचनामा अहवाल जोडलेला आहे. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर संकलन अधिकारी) यांचा अभिप्राय की, दि.१०/०८/२०२२ रोजी स्थळ पाहणी अहवालानुसार व म्यु.पल यांच्या पाहणीनुसार विभागाने सादर केलेला प्रस्ताव 'अ'नुसार मनपा अधि.१९४९ मधील कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस आदेशार्थ सादर./'ब'.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विहीत नमुन्यामध्ये सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीने स्थळ पंचनामा सादर करावा.
यावर वसुली लिपीक यांनी पान नं. २ वर फेर सादर केलेले आहे.
यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित 'अ' व 'ब'नुसार मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस आदेशार्थ सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अर्जदाराही सध्या पाणी कोढुण वापर करता?
यावर वसुली लिपीक/करनिरीक्षक व प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, **फेरसादर** केले.
उपरोक्त प्रकरणी प्रभाग समिती कार्यालय चार बुरुडगाव येथील कार्यक्षेत्रामधील करपात्र मिळकत ही मालमत्ता कर वसुल होणे कामी तसेच संकलन वार्ड नं २४ मधील बंद स्वरुपात असुन सदरच्या मिळकतीच्या पाणी नळ जोडणी बाबतचा उपभोग कोणी रहीवास नसल्याने होत नाही. सदरच्या ठिकाणी पाणी पिण्याकरीता व वापर करीता आतील वापर नसलेला मिळकतीचे स्वरुप बंद स्वरुपात कायम रित्या आसल्याने सदरच्या मिळकतीस महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ कलम १५२ अन्वये सदरील बिल निर्लेखित करणेस आदेशार्थ सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मालमत्ता कराबाबत सद्यस्थिती काय आहे?
यावर वसुली लिपीक/करनिरीक्षक व प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, **फेरसादर** केले.
सदरील मिळकत धारक यांना पाणीपट्टीचे देयक विभक्त बिल नं. Z४२४०००३३३ परेश राम विलास झंवर यां नावे चुकीचे बिल येत असुन सदरील मिळकतीस नळ जोडनी नसले बाबत स्थळ पंचनामा सादर केला आहे. तसेच नळ जोडनी नसले बाबत कळविलेले आहे. सदरील मिळकत धारक यांनी मालमत्ता कराचे देयक सन २०२२/२३ ची थकबाकी पा.नं. AMC २२२३६९००५९४१ दि.२३/५/२०२२ नुसार रु.११३९७/- ची संपुर्ण थकबाकी भरलेली असून त्यांना चुकीचे पाणी कनेक्शन आसल्या बाबतचे चुकीचे बिल येत असून सदरील बिल नं. Z४२४०००३३३ चे बिल हे महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील कलम १५२ तसेच कराधान नियम २०(१) फ अन्वये रद्द करणेस सविनय आदेशार्थ सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- श्री. परेश रामविलास झंवर, रा.केडगांव इंडइस्टेट यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २०२२-२०२३ अखेर ( वॉर्ड क्र.२४ बील क्रमांक Z४२४००००३३३) पाणीपटटी रूपये ९९४००/- व २% दंडात्मक शास्ती १०५२४१/- अशी एकुण रु.२०४६४१/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोट आहे.
मा.श्री.प्रदिप परदेशी :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.प्रदिप परदेशी :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.
मा.श्री.शेख मुदस्सर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.
मा.सभापती साहेबः- श्री. परेश रामविलास झंवर, रा.केडगांव इंडइस्टेट यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २०२२-२०२३ अखेर ( वॉर्ड क्र.२४ बील क्रमांक Z४२४००००३३३) पाणीपटटी रूपये ९९४००/- व २% दंडात्मक शास्ती १०५२४१/- अशी एकुण रु.२०४६४१/- चे बील निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

विषय क्रमांक ३८ ते ४१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

ठरावः- ऑफिस रिपोर्ट नुसार श्री. परेश रामविलास झंवर, रा.केडगांव इंडइस्टेट यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २०२२-२०२३ अखेर ( वॉर्ड क्र.२४ बील क्रमांक Z४२४००००३३३) पाणीपटटी रूपये ९९४००/- व २% दंडात्मक शास्ती १०५२४१/- अशी एकुण रु.२०४६४१/- चे बील निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

विषय क्रमांक ३८ ते ४१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रदिप परदेशी - सही/-

अनुमोदकः- मा.श्री.शेख मुदस्सर - सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक - ४२** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.३ हा अनाथ निराधार, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक व विदयार्थीसाठी यशस्वीरित्या काम करणारी संस्था हेल्पिंग हॅडस युथ फाऊडेशन या संस्थेच्या सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा आरोग्य कामाकरिता इमारत खोली नामनात्र दरामध्ये मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग.

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.३ ची निविदा दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रात प्रसिध्द केली होती सदर निविदा अर्जाची विक्री दि.२०-४-२०२३ ते २८-४-२०२३ पर्यंत होती तसेच सदर निविदा बयाना रक्कम भरुन घेऊन दि.२-५-२०२३ रोजी दुपारी २:०० वाजे पर्यंत निविदा अर्ज स्विकारण्याची मुदत होती सदर मुदतीमध्ये १) आमल अब्बास इनामदार, अहमदनगर २) श्री.संकेत राजेंद्र बळीद, अहमदनगर ३) हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर या तीन निविदेचे लिफाफे प्राप्त झाले आहेत.

तरी वरील निविदाधारकाचे लिफाफे समक्ष उघडेकामी निविदा समितीची बैठक दि.१६-५-२०२३ रोजी सकाळी ११:३० वाजता आयोजित केली होती याबाबत मा.मुख्यलेखापरिक्षक, मा.लेखाधिकारी मनपा यांनी ई-निविदेची बाब आमच्या कक्षेत येते आपल्या विभागाने दरपत्रक मागविले असल्याने याबाबत वरिष्ठ्स्तरावर निर्णय घेणे उचित होईल असे सुचित केलेनुसार सदर निविदेचे लिफाफे मा.उपायुक्त तथा मुल्यनिर्धारक करसंकलन अधिकारी व निविदाधारक समक्ष उघडण्यात आले असुन प्राप्त निविदेचा तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदाधारकांचे नाव | मा.त्रिसदस्यीय समितीने प्रमाणित केलेले दरमहा भाडे | निविदाधारकाने निविदेत नमुद केलेले दरमहाभाडे | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | आमल अब्बास इनामदार | ११११३३/- | ११११३३/- | १३३६००/- |
| २ | श्री.संकेत राजेंद्र बळीद | ११११३३/- | ११२०१/- | १३३६००/- |
| ३ | हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन | ११११३३/- | ११३००/- | १३३६००/- |

वरील विषयांकित व्यापारी संकुलातील हॉल क्र.३ करिता मुदतीत तीन निविदा अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर या निविदाधारकांनी मा.त्रिसदस्यीय समितीने प्रमाणित केलेल्या दरमहा भाडे रु.१११३३/- पेक्षा जास्त दरमहाभाडे रु.११३००/- देण्याचे निविदा अर्जात नमुद केले आहे.

तरी हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर यांनी निविदा स्पर्धेत जास्तीत जास्त दरमहाभाडे रु.११३००/- व अनामत रक्कम रु.१३३६००/- देण्याचे नमुद केले आहे. त्यामुळे त्यांची निविदा मंजुर करणेस शिफारस आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.३ चे क्षेत्र ४७.२२ चौ.मी. इतके असुन त्याचे दरमहा भाडे रु.११३००/- (कराविरहित) व अनामत रक्कम रु.१३३६००/- घेऊन २ वर्षे ११ महिने कराराने भाड्याने देणेकामी निविदेच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर यांस उपरोक्त हॉल भाडेतत्वावर देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्र.मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब तथा मुल्यनिर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, मुलेप/मुलेअ यांची छाननी तक्त्यावर स्वाक्षरी घेऊन सादर करा.

यावर प्र.मार्केट विभाग प्रमुख यांनी मा.फेर सादर केले.

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट फेर सादर करण्यात येते की, आपण आदेशीत केल्यानुसार छानणी तक्त्यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आली असुन मा.मुख्यलेपरिक्षक हे गैरहजर आहेत.

तरी हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर यांनी निविदा स्पर्धेत जास्तीत जास्त दरमहाभाडे रु.११३००/- व अनामत रक्कम रु.१३३६००/- देण्याचे नमुद केले आहे. त्यामुळे त्यांची निविदा मंजुर करणेस शिफारस आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.३ चे क्षेत्र ४७.२२ चौ.मी. इतके असुन त्याचे दरमहा भाडे रु.११३००/- (करविरहित) व अनामत रक्कम रु.१३३६००/- घेऊन २ वर्षे ११ महिने कराराने भाड्याने देणेकामी निविदेच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर यांस उपरोक्त हॉल भाडेतत्वावर देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यावर यावर मा.उपायुक्त साहेब तथा मुल्यनिर्धारक कर संकलन अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.३ हा अनाथ निराधार, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक व विदयार्थीसाठी यशस्वीरित्या काम करणारी संस्था हेल्पिंग हॅडस युथ फौडेशन या संस्थेच्या सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा आरोग्य कामाकरिता इमारत खोली नामनात्र दरामध्ये मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.शेख मुदस्सरः- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- हेल्पिंग हॅडस युथ फौडेशन या संस्थेने जा.क्र.४२ दि-३०/६/२०२३ रोजी पत्र दिलेले असुन त्यामध्ये त्यांनी सदरची संस्था सामाजिक काम करित असल्याने अनामत रक्कमेमध्ये सवलत मिळणेबाबतची मागणी केलेली आहे. हेल्पिंग हॅडस युथ फौडेशन हि संस्था अनाथ निराधार, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक व विदयार्थीसाठी तसेच सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा आरोग्य विषयक समाज उपयोगी कामे करत असतात यांची कामे चांगली आहेत. अनामत रक्कमेबाबत निर्णय घेण्यात यावा.

मा.सुनिल त्र्यंबकेः- या संस्थेला भाडे किती व अनामत रक्कम किती आहे?

मार्केट विभाग प्रमुख श्री.बालानीः- या संस्थेला दरमहा भाडे रु.११३००/- (करविरहित) व अनामत रक्कम रु.१३३६००/- भरावी लागणार आहे.

मा.श्री.संपत बारस्करः- अनामत रक्कम कशी आकारली जाते.

मार्केट विभाग प्रमुख श्री.बालानीः- अंदाजे दर महाभाडे रक्कम X १२ महिने अशा पध्दतीने आकारली जाते. ११३००/- X १२ = १३३६००/-

मा.सभापती साहेबः- हेल्पिंग हॅडस युथ फौडेशन हि संस्था अनाथ निराधार, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक व विदयार्थीसाठी तसेच सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा आरोग्य विषयक समाज उपयोगी कामे करत असल्याने अनामत रक्कमे पोटी तीन महिन्याचे दरमहा भाडे आकारण्यात यावे. अनामत रक्कम कमी करणेबाबतचा निर्णय नियमानुसार व कायदेशीर तपासणी करुन प्रशासनाने घ्यावा.

मा.श्री.शेख मुदस्सरः- सदर जागेची मनपास भविष्यात आवश्यकता लागल्यास तातडीन मनपाच्या ताब्यात घेता येईल. अशी अटी व शर्ती मध्ये नमुद करण्यात यावे. ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सुनिल त्र्यंबकेः- हेल्पिंग हॅडस युथ फौडेशन हि संस्था अनाथ निराधार, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक व विदयार्थीसाठी तसेच सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा आरोग्य विषयक समाज उपयोगी कामे करत असल्याने तीन महिन्याचे भाडे अनामत रक्कम सदर संस्थेकडुन घेण्यात यावे.

मा.श्री.प्रदिप परदेशी - ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.३ हा अनाथ निराधार, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक व विदयार्थीसाठी यशस्वीरित्या काम करणारी संस्था हेल्पिंग हॅडस युथ फौडेशन या संस्थेच्या सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा आरोग्य कामाकरिता इमारत खोली नामनात्र दरामध्ये क्षेत्र ४७.२२ चौ.मी. त्याचे दरमहा भाडे रु.११३००/- (करविरहित) व अनामत रक्कम रु.१३३६००/- घेऊन २ वर्षे ११ महिने कराराने भाड्याने देणेकामी निविदेच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर यांस उपरोक्त हॉल भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर यांचा प्राप्त अर्ज व सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अनामत रक्कमे पोटी तीन महिन्याचे दरमहा भाडे आकारण्यात यावे. अनामत रक्कम कमी करणेबाबतचा निर्णय नियमानुसार व कायदेशीर तपासणी करुन प्रशासनाने घ्यावा.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.३ हा अनाथ निराधार, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक युवक व विदयार्थीसाठी यशस्वीरित्या काम करणारी संस्था हेल्पिंग हॅडस युथ फौडेशन या संस्थेच्या सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा आरोग्य कामाकरिता इमारत खोली नामनात्र दरामध्ये क्षेत्र ४७.२२ चौ.मी. त्याचे दरमहा भाडे रु.११३००/- (करविरहित) व अनामत रक्कम रु.१३३६००/- घेऊन २ वर्षे ११ महिने कराराने भाड्याने देणेकामी निविदेच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर यांस उपरोक्त हॉल भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच हेल्पिंग हॉण्डस युथ फौंडेशन, अहमदनगर यांचा प्राप्त अर्ज व सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अनामत रक्कमे पोटी तीन महिन्याचे दरमहा भाडे आकारण्यात यावे. अनामत रक्कम कमी करणेबाबतचा निर्णय नियमानुसार व कायदेशीर तपासणी करुन प्रशासनाने घ्यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शेख मुदस्सर - सही/-

अनुमोदकः- मा.श्री.प्रदिप परदेशी - सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

---

**विषय क्रमांक - ४३** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमद्नगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील दैनंदिन कचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणाकरिता खाजगी संस्थेची नेमणूक करणेकामी दर निश्चित करुन संस्था नियुक्त करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग.

**संदर्भ:-**१) T.ID.ANMC ८९४६१९.
२) मा.उपायुक्त (कर) यांची दि. १५-०५-२०२३ ची मंजुर टिप्पणी.
३) दि.०८-०६-२०२३ रोजी झालेल्या मा.छानणी समितीमधील निर्णय.
४) मा.आयुक्त यांची दि.१५-०६-२०२३ ची मंजुर टिप्पणी.

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी घनकचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणाकरिता ICT Based Technology च्या अंमलबजावणीकरिता शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील निर्माण होणा-या कच-याचे संकलन व वाहतूक करणा-या वाहनांचे मागोवा व संनियंत्रण (Tracking and Monitoring) करण्याकरिता अंमलबजावणी करणेकामी संदर्भान्वये ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर ई-निविदेमधील तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची छानणी केली असता प्राप्त तिन्ही निविदाकार संस्था पात्र असल्यामुळे सदर तिन्ही निविदाकारांचे व्यापारी लिफाफे उघडले असता मे.आयोटीक सोल्यूशन्स प्रा.लि. या संस्थेचे दर रु.३६,६०,०००/- प्रमाणे लघुत्तम प्राप्त झालेले होते. त्याप्रमाणे सदर संस्थेस दरांबाबत वाटाघाटी करणेकरिता बोलाविले असता, दि.०८-०६-२०२३ रोजी मा.छानणी समितीसमोर दराबाबत वाटाघाटी होवून सदर संस्थेने रक्कम रु.३४,००,०००/- वस्तू व सेवा करासह या दरामध्ये काम करण्यास तयार असलेबाबत संदर्भ क्र.४ अन्वये पत्र सादर केलेले आहे. तसेच मा.छानणी समितीने सदर कामी वार्षिक देखभाल व दुरुस्तीकरिता सदर संस्थेसोबत ५ वर्षांकरिता CMC करणेस सदर कामी मुळ रक्कमेच्या २५% प्रति वर्ष याप्रमाणे ५ वर्षाकरिता येणा-या सदर खर्च पुढील आर्थिक वर्ष सन २०२४-२५, सन २०२५-२६,२०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ पर्यंत खर्च देणेस मान्यतेसाठी व सदर संस्थेशी करारनामा करुन घेणेस व दर मंजुरी होणेस्तव सदर अहवाल सविनय सादर केला असता मा.आयुक्त यांनी सदरबाबत निर्णय होणेस मा.स्थायी समितीकडे सादर करणेबाबत मान्यता दिलेली असून सदर बाबत निर्णय होणेकामी मा.स्थायी समितीकडे सविनय सादर./'अ'.

येणे प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर सहाय्यक लेखापरिक्षक व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, तांत्रिक छाननी समितीच्या शिफारशीनुसार तसेच विभागाने प्रस्तावित केलेनुसार 'अ' कार्यवाहीस्तव.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित 'अ' नुसार दर मंजुरी करीता मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समिती समोर तात्काळ विषयपत्रिकेवर विषय घेणेबाबत (२४ तासात) पत्र देणेत यावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अहमद्नगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील दैनंदिन कचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणाकरिता खाजगी संस्थेची नेमणूक करणेकामी दर निश्चित करुन संस्था नियुक्त करणेबाबतचा ऑफिस रिपोट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.संपत बारस्कर :- घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख माहिती सांगा.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.के.के.देशमुखः- मा.शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी घनकचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणाकरिता ICT Based Technology च्या अंमलबजावणीकरिता अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील निर्माण होणा-या कच-याचे संकलन व वाहतूक करणा-या वाहनांचे मागोवा व संनियंत्रण (Tracking and Monitoring) करण्याकरिता अंमलबजावणी करणेकामी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. याकामी तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. छाननी समितीच्या शिफारशीनुसार कमी दराच्या निविदेस मान्यता देण्याकरिता सदरचा विषय समितीपुढे ठेवण्यात आला आहे.

मा.श्री.सुनिल त्र्यंबकेः- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.प्रदिप परदेशीः- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेबः- अहमद्नगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील दैनंदिन कचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणाकरिता खाजगी संस्थेची नेमणूक करणेकामी मे.आयोटीक सोल्यूशन्स प्रा.लि. यांच्या लघुत्तम प्राप्त झालेल्या निविदेस मा.छानणी समितीने केलेल्या शिफारशीनुसार मान्यता देण्यात येत आहे. तसेच दैनंदिन कचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणकरणे कामी वार्षिक देखभाल व दुरुस्तीकरिता मे.आयोटीक सोल्यूशन्स प्रा.लि. संस्थेसोबत ५ वर्षांकरिता CMC करणेस सदर कामी मुळ रक्कमेच्या २५% प्रति वर्ष याप्रमाणे ५ वर्षाकरिता येणा-या सदर खर्च पुढील आर्थिक वर्ष सन २०२४-२५, सन २०२५-२६,२०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ पर्यंतच्या होणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमद्नगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील दैनंदिन कचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणाकरिता खाजगी संस्थेची नेमणूक करणेकामी मे.आयोटीक सोल्यूशन्स प्रा.लि. यांच्या लघुत्तम प्राप्त झालेल्या निविदेस मा.छानणी समितीने केलेल्या शिफारशीनुसार मान्यता देण्यात येत आहे. तसेच दैनंदिन कचरा संकलन प्रक्रियेच्या संनियंत्रणकरणे कामी वार्षिक देखभाल व दुरुस्तीकरिता मे.आयोटीक सोल्यूशन्स प्रा.लि. संस्थेसोबत ५ वर्षांकरिता CMC करणेस सदर कामी मुळ रक्कमेच्या २५% प्रति वर्ष याप्रमाणे ५ वर्षाकरिता येणा-या सदर खर्च पुढील आर्थिक वर्ष सन २०२४-२५, सन २०२५-२६,२०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ पर्यंतच्या होणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सुनिल त्र्यंबके - सही/-

अनुमोदकः- मा.श्री.प्रदिप परदेशी - सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक - ४४** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृह रुग्णांकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी आहारतज्ञांची प्रति दिन मानधन प्रमाणे पॅनल शिपवर नेमणूक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह विभाग.

संदर्भ:- १) दैनिक वर्तमान पत्र नगरी दवंडी मधील १५/०२/२०२३ ची जाहीरात.
२) श्रीमती नम्रता विनित मकासरे यांचा १७/०२/२०२३ चा विनंती अर्ज.
३) कै.बा.दे.दवाखाना जा.क्र.२६७ दि.२७/०७/२०२२ ने पॅनल नेमणूक आदेशान्वये स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची पॅनलशीपवर नेमणुक
४) जा.क्र.कै.बा.दे.दवाखाना ३७० दिनांक ०१/०९/२०२१ ने भुलतज्ञ डॉक्टरांचा पॅनल नेमणूक.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृह येथेब दिनांक १ एप्रिल २०१३ पासुन केंद्र शासनाची व राज्य शासनाची जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम ही योजना दवाखान्यामध्ये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदरच्या योजनेनुसार दवाखान्यामध्ये देण्यात येणा-या प्रसुतीसंदर्भात सर्व सेवा सुविधा रुग्णांना महानगरपालिकेमार्फत मोफत पुरविण्यात येत आहेत. सदर योजनेचीच एक बाब म्हणून मोफत आहार सुविधा देण्यात येते. सदर योजने करिता खाजगी संस्थेची नियुक्ती करुन रुग्णांना आहार पुरविला जातो. सदर पुरविण्यात येणा-या आहाराची दैनंदीन तपासणी, दर्जा व मात्रा तपासणीकरिता आहारतज्ञांची आवश्यकता भासते. तसेच गरोदर मातांना आहारासंबंधी समुपदेशन व मार्गदर्शन करणेकामी आहार तज्ञाची आवश्यकता भासते. यापुर्वी आर.सी.एच./एन.यु.एच.एम.विभागामार्फत आहारतज्ञांची मानधनवर नेमणूक करण्यात आलेली होती. मात्र एन.यु.एच.एम.विभागामार्फत तांत्रिक अडचणीमुळे आहारतज्ञांची मानधनवरील नियुक्ती संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे सध्या दवाखान्यामध्ये आहार तज्ञ उपलब्ध नाही.

यास्तव संदर्भ क्र.१ ने स्थानिक वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन शहरातील इच्छुक आहारतज्ञ यांची आर.सी.एच./एन.यु.एच.एम.विभागामार्फत मानधनानुसार रु.७००/- प्रति दिन या प्रमाणे मानधन देऊन पॅनल तयार करणे कामी कै.बा.दे.दवाखाना येथे अर्ज मागविण्यात आले. संदर्भ क्रमांक २ नुसार श्रीमती नम्रता विनित मकासरे B.sc (Home Science), M.sc.(Food & Science) यांनी पॅनलशीपवर आहारतज्ञ म्हणुन नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. तसेच सध्या दवाखान्याकरिता वरील संदर्भ क्रमांक ०३ व ०४ नुसार अनुक्रमे स्त्रीरोगतज्ञ व भुलतज्ञ डॉक्टरांचे तीन वर्षे कालावधीकरिता पॅनलची नेमणूक करण्यात आलेली आहे.

तसेच पॅनलची नेमणूक केल्यानंतर एखादा आहारतज्ञ नी पॅनलमध्ये नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केल्यास त्याच्या अर्जाचा विचार करुन प्रस्ताव ठेवून प्रशासकी मंजुरी घेऊन पॅनलमध्ये त्यांना समाविष्ट करण्यात येईल. सदरचे पॅनल नेमणे, त्यामध्ये नाव समाविष्ट करणे/ वगळणे, त्यांचे मानधन अदा करणे बाबत सर्व कार्यवाही कै.बा.दे.दवाखान्याच्या कार्यालया मार्फत करण्यात येणार आहे.

तरी दवाखान्यामध्ये आहारतज्ञ अभावी गैरसोय होऊ नये म्हणुन वरील श्रीमती नम्रता विनित मकासरे ह्या आहारतज्ञांची तीन वर्षाकरिता पॅनलशीपवर नेमणुक करुन प्रति दिन रु.७००/- (रु.सातशे फक्त) मानधन निश्चित करुन पॅनल नेमणुक करणेकामी प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव व मंजुरीस्तव सविनय सादर./'अ'.

येंणे प्रमाणे प्र.वैद्यकीय अधिक्षक यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, 'अ' प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, discussed and appruved as proposed

यावर प्र.वैद्यकीय अधिक्षक यांचा अभिप्रय की, प्रस्तावित 'अ' प्रमाणे मा.स्थायी समितीपुढे पॅनलशीपवर नेमणुक करणे बाबत विषय मंजुरीस्तव घेणेकामी कार्यवाहीस्तव आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृह रुग्णांकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी आहारतज्ञांची प्रति दिन मानधन प्रमाणे पॅनल शिपवर नेमणूक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- डॉ.राजुरकर याबाबतची माहिती सांगा.

वैद्यकीय अधिक्षक डॉ.राजुरकर - कै.बा.दे.दवाखाना येथे रुग्णांना मोफत चहा, नाष्टा, जेवण पुरविण्यात येते. या जेवणाची तपासणी करीता डॉक्टरांचे पथक नियुक्त करणे आहे. त्यांचे पॅनल नेमावयाचे आहे. पॅनलची मुदत ३ वर्षाकरिता आहे. दररोज त्यांनी ६ तास उपस्थित राहणे आवश्यक आहे. एका दिवसाकरीता आपण त्यांना रु.७००/- मानधन देणार आहे.

मा.श्री.सुनिल त्र्यंबके:- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.प्रदिप परदेशीः- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृह रुग्णांकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी आहारतज्ञांची प्रति दिन दवाखान्यामध्ये आहारतज्ञ अभावी गैरसोय होऊ नये म्हणुन वरील श्रीमती नम्रता विनित मकासरे ह्या आहारतज्ञांची तीन वर्षाकरिता पॅनलशीपवर नेमणुक करुन प्रति दिन रु.७००/- (रु.सातशे फक्त) मानधन निश्चितीस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच सदरचे पॅनल नेमणे, त्यामध्ये नाव समाविष्ट करणे/ वगळणे, त्यांचे मानधन अदा करणे बाबत सर्व कार्यवाही कै.बा.दे.दवाखान्याच्या कार्यालया मार्फत करण्यात यावी.

ठरावः- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृह रुग्णांकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी आहारतज्ञांची प्रति दिन दवाखान्यामध्ये आहारतज्ञ अभावी गैरसोय होऊ नये म्हणुन वरील श्रीमती नम्रता विनित मकासरे ह्या आहारतज्ञांची तीन वर्षाकरिता पॅनलशीपवर नेमणुक करुन प्रति दिन रु.७००/- (रु.सातशे फक्त) मानधन निश्चितीस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच सदरचे पॅनल नेमणे, त्यामध्ये नाव समाविष्ट करणे/ वगळणे, त्यांचे मानधन अदा करणे बाबतची कार्यालयीन सोपस्कार कै.बा.दे.दवाखान्याच्या कार्यालया मार्फत करण्यात यावी. ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सुनिल त्र्यंबके - सही/-

अनुमोदकः- मा.श्री.प्रदिप परदेशी - सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक - ४५** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमद्नगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम व आकृतीबध सुधारणा,दुरुस्ती व नवीन पदे निर्माण करण्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

विनंती प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, डॉ.सौ.भाग्यश्री हंबीरे, डॉ. सौ. वृषाली पाटील, डॉ.सौ.शिल्पा पाठक यांनी दि.१६-१२-२०२२ अन्वये अर्ज देवून, जा.क्र.आस्थापना/सेआप्रयो ३७९५ दिनांक ०१-१२-२०२१ अन्वये, आश्वासित प्रगती योजनेचा १ ला लाभ मिळणेकामी अपात्र असलेबाबत आस्थापना विभागाकडून पत्र प्राप्त झालेले असलेबाबत नमुद करुन, 'आम्ही १२ वर्षानंतरची आश्वासित प्रगती योजनेचा लाभ करिता पात्र असुन त्यानुसार आम्हाला नियमाप्रमाणे १२ वर्षाच्या पदोन्नतीने वेतनवाढ व त्या अनुषंगाने होणारा फ़रक मिळावा ही विनंती,' याप्रमाणे विनंती केली आहे.

उपरोक्त अर्जदार यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नांव | वेतनश्रेणी व ग्रेड पे | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.भाग्यश्री दयानंद हंबीरे | ९३००-३४८०० / ५४०० | वैद्यकीय अधिकारी | एम.बी.बी.एस.,डी.एम.आर.डी., Mscit |
| २ | डॉ.वृषाली प्रभास पाटील | ९३००-३४८०० / ५४०० | वैद्यकीय अधिकारी | एम.बी.बी.एस., डी.जी.ओ., Mscit |
| ३ | डो.शिल्पा श्रीकांत पाठक | ९३००-३४८०० / ५४०० | वैद्यकीय अधिकारी | एम.बी.बी.एस., डी.जी.ओ., Mscit |

मा.शासनाने शासन निर्णय क्रमांक - अमपा २०१२/ प्र.क्र.३०१ (भाग-२) नवि-२५, मंत्रालय, मुंबई दिनांक ६ फ़ेब्रुवारी, २०१६ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचा ३१ विभाग अंतर्गत एकूण २८७० पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजुर केलेला आहे. मा.शासन निर्णय क्रमांक:अमपा-२०१७/प्र.क्र.३३८/नवि-२५दि.१६ डिसेंबर,२०२१ अन्वये नगररचनाकार या पदनामाचे १ पद मंजुर केलेले आहे. याप्रमाणे एकुण २८७१ पदांचा आकृतीबंध मंजुर आहे. उपरोक्त मंजुर आकृतीबंधातील पदांचे सेवाप्रवेश नियमास मा.शासनाने दि.६ फ़ेब्रुवारी, २०१६ रोजी मंजुरी दिलेली असुन दि. २३ डिसेंबर, २०२१ रोजी व २८ मार्च, २०२२ रोजी अन्वये सदर सेवाप्रवेश नियमामध्ये सुधारणा करण्यांत आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी (श्रेणी-२) या पदनामाचे पदे मंजुर असुन सदर पदाचे खालीलप्रमाणे सेवाप्रवेश नियम मंजुर आहेत.

| सेवा प्रवेश नियम अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम (वेतनश्रेणी व ग्रेड पे) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नामनिर्देशनाने वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणूकीच्यापध्दती |
|---|---|---|---|---|---|
| ९७ | वैद्यकीय सेवा श्रेणी-२ | वैद्यकीय अधिकारी (वे.श्रे.९३००-३४८०० ग्रेड पे-४४००) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस / बी.ए.एम.एस. (आयुर्वेद) / बी.एच.एम.एस. (होमिओपॅथी) किंवा शासनमान्य समकक्ष पदवी.(ब) शासकीय / निमशासकीय / खासगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव.(क) महाराष्ट्र मेडीकल कौन्सील अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक. |

उपरोक्त पदावरुन पदोन्नतीसाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी-१ पद, वैद्यकीय अधिक्षक-१ पद, स्त्री रोग तज्ञ-१ पद, याप्रमाणे पदे मंजुर असुन सदर पदांची खालीलप्रमाणे सेवाप्रवेश नियम मंजुर आहेत.

| सेवा प्रवेश नियम अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम (वेतनश्रेणी व ग्रेड पे) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नामनिर्देशनाने वयोमर्यादा | नेमणुकीची अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|---|
| ९४ | वैद्यकीय सेवा श्रेणी-१ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी (वे.श्रे.१५६००-३९१०० ग्रेड पे-६६००) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० वर्षे | (अ)मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी. M.D.(P.S.M.) परीक्षा उत्तीर्ण (ब) राज्य/ केंद्रशासन/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहाय्यक आरोग्य अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ७ वर्षाचा पर्यवेक्षकीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक.(क) रुग्णालयातील प्रशासन , सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषतः स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मुलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदी बाबींच्या कार्याचा किमान ७ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणा-या उमेदवार प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणा-या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत आरोग्य अधिकारी रुग्णालये / आरोग्य अधिकारी प्रतिबंधात्मक उपाय किंवा वैद्यकीय अधिकारी या संवर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | प्रतिनियुक्ती | | नामनिर्देशन व पदोन्नतीसाठी योग्य अधिकारी उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणा-या शासनाकडिल योग्य अधिका-याच्या प्रतिनियुक्तीने. |
| ९५ | वैद्यकीय सेवा श्रेणी-१ | वैद्यकीय अधिक्षक (आरोग्याधिकारी) (वे.श्रे.९३००-३४८०० ग्रेड पे-५४००) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी. [M.D./ M.S.(Clinical)] (ब) रुग्णालय प्रशासन पदविका (D.H.A.) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्य. (क) राज्य/ केंद्रशासन / निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील किमान ३०० खाटांच्या रुग्णालयातील निवासी वैद्यकीय वैद्यकीय वा तत्सम पदावरील किमान ५ वर्षाचा पर्यवेक्षकीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणा-या महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी वा तत्सम या संवर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव धारण करणा-या उमेदवारांमधुन सेवाज्येष्ठता व गुणवत्ता याआधारे. |
| | | | प्रतिनियुक्ती | | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणा-या शासनाकडील योग्य अधिका-याच्या प्रतिनियुक्तीने. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०० | वैद्यकीय सेवा श्रेणी-१ | स्त्री रोग तज्ञ (वे.श्रे.९३००-३४८०० ग्रेड पे-५४००) | नामनिर्देशन १००% | ३५ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.डी. (स्त्री व प्रसुतीरोगशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.किंवा समकक्ष पदवी. ब) शासकीय / निमशासकीय / खासगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव. |

वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदाची सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठी 'मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी. M.D.(P.S.M.) परीक्षा उत्तीर्ण .' याप्रमाणे शैक्षणिक अर्हता आहे. डॉ. अनिल बोरगे यांची शैक्षणिक अर्हता M.B.B.S, Diploma in Public Health याप्रमाणे आहे. तथापी मा.शासन निर्णय क्रमांक : अमपा-२०१४ / प्र.क्र.१५/ नवि-२५ मंत्रालय मुंबई दि.२० एप्रिल, २०१६ अन्वये डॉ.अनिल अशोक बोरगे यांना वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर पदोन्नतीस मान्यता दिलेली आहे. व ' मात्र भविष्यात सदर वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर नेमणुक करताना अहमदनगर महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमानुसार M.D., P.S.M. ही शैक्षणिक अर्हता आवश्यक राहील.' याप्रमाणे सुचित केले आहे. वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदाची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००/- याप्रमाणे आहे.

वैद्यकीय अधिक्षक-१ पद, या पदाची सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठी 'मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी. [M.D./ M.S.(Clinical)]' याप्रमाणे शैक्षणिक अर्हता आहे व वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ५४००/- याप्रमाणे आहे.

तसेच स्त्री रोग तज्ञ -१ पद, या पदाची नामनिर्देशनाने ' मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.डी. (स्त्री व प्रसुतीरोगशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.किंवा समकक्ष पदवी.' याप्रमाणे शैक्षणिक अर्हता आहे. व वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ५४००/- याप्रमाणे आहे.

त्यामुळे वैद्यकीय अधिक्षक-१ पद, या पदाची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००/- याप्रमाणे ठेवणे उचित होईल असे वाटते. तसेच अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर स्त्री रोग तज्ञ या पदनामाचे १ पद मंजुर आहे. तथापी अहमदनगर महानगरपालिका, कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना मार्फत अहमदनगर शहर व जिल्ह्यातील अनेक महिलांना अनेक वर्षापासुन सेवा दिली जात असुन त्याकामी सदर पदनामाची एकून ४ पदे निर्माण करणे व वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००/- याप्रमाणे प्रस्तावित करणे उचित होईल. सदरच्या पदावर ५० टक्के सरळसेवेने, ५० टक्के पदोन्नतीने भरती प्रस्तावित करणे उचित होईल.

तसेच अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर रेडोओलॉजिस्ट या पदनामाची २ पदे निर्माण करणे व वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००/- प्रस्तावित करणे आवश्यक वाटते. सदर पदावर ५० टक्के सरळसेवा ५० टक्के पदोन्नतीने भरणे उचित होईल. सदर पदाची शैक्षणिक अर्हता ' M.B.B.S., M.D. - Radiology किंवा M.B.B.S, D.M.R.D किंवा M.B.B.S, D.M.R.E. किंवा समकक्ष पदवी याप्रमाणे प्रस्तावित करणे उचित होईल./'ब'.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ५१ (२) अन्वये मा.स्थायी समितीच्या मंजुरीने सदरचा प्रस्ताव सोबतच्या विवरणपत्रासह मा.शासनाकडे सादर करणेबाबत मंजुरीस्तव सविनय सादर./'अ'.

येणे प्रमाणे मा.सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार सेवा शर्ती नियमातील बदलाबाबत मा.शासनाकडे मान्यता मिळणेसाठी अधिनियमातील कलम ५१(२) नुसार कार्यवाही करणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, 'अ' व 'ब' नुसार मान्यतेस्तव मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेब:- अहमद्नगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम व आकृतीबध सुधारणा,दुरुस्ती व नवीन पदे निर्माण करण्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब:- प्रस्तावातील तीन अर्जदार यांनी काय मागणी केली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :-अर्जदाराचे अर्जाचे वाचन करण्यात यावे.

अर्जदाराच्या अर्जाचे वाचन आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे यांनी केले.

मा.श्री.सुनिल त्रिंबके:- अर्जदार यांनी १२ वर्षाच्या पदोन्नतीने वेतनवाढ मिळणेबाबत अर्ज केलेला असतांना प्रस्ताव वेगळाच बनविलेला दिसनु येत आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे अशोक:- अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर स्त्री रोग तज्ञ या पदनामाचे १ पद मंजुर आहे. तथापी अहमदनगर महानगरपालिका, कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना मार्फ़त अहमदनगर शहर व जिल्ह्यातील अनेक महिलांना अनेक वर्षापासुन सेवा दिली जात असुन त्याकामी सदर पदनामाची एकून ४ पदे निर्माण करणे व वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००/- याप्रमाणे प्रस्तावित करणे उचित होईल. सदरच्या पदावर ५० टक्के सरळसेवेने, ५० टक्के पदोन्नतीने भरती प्रस्तावित करणे. तसेच अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर रेडोओलॉजिस्ट या पदनामाची २ पदे निर्माण करणे व वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००/- प्रस्तावित करणे आवश्यक वाटते. सदर पदावर ५० टक्के सरळसेवा ५० टक्के पदोन्नतीने भरणे उचित होईल. सदर पदाची शैक्षणिक अर्हता 'M.B.B.S.,M.D.- Radiology किंवा M.B.B.S, D.M.R.D किंवा M.B.B.S, D.M.R.E. किंवा समकक्ष पदवी याप्रमाणे प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ५१ (२) अन्वये मा.स्थायी समितीच्या मंजुरीने सदरचा प्रस्ताव सोबतच्या विवरणपत्रासह मा.शासनाकडे सादर करणेबाबत मंजुरीस्तव सभेपुढे ठेवला आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख:- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा. सदरचा प्रस्ताव पदे निर्मिती व मंजुरी करीता मा.शासनाकडे पाठविण्यात यावा.

मा.श्री.सुनिल त्र्यंबके:- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब:- अहमद्नगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम व आकृतीबध सुधारणा,दुरुस्ती व नवीन पदे निर्माण करण्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात येत आहे. सदरचा प्रस्ताव विवरणपत्रासह मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव:-** अहमद्नगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम व आकृतीबध सुधारणा,दुरुस्ती व नवीन पदे निर्माण करण्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात येत आहे. सदरचा प्रस्ताव विवरणपत्रासह मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख - सही/-

अनुमोदक:- मा.श्री.सुनिल त्र्यंबके - सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४

**विषय क्रमांक - ४६** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी डॉ. सौ. रेणुका प्रणव जोशी यांची यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

संदर्भ : कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र. २७ दि. १७/०४/२०२३ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा. क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना २७ दि. १७/०४/२०२३ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. ०४/०८/२०२२ ते ०३/०२/२०२३ अखेर असुन सदरची मुदत ही दि. ०४/०२/२०२३ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि. ०७/०२/२०२३ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. १२५ दि. ०६/०२/२०२३ च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ५४७५ दि. १७/०३/२०२३ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांची रु. ३०,८००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. ०४/०८/२०२२ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. ०४/०२/२०२३ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक ०७/०२/२०२३ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ३०,८००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./'अ'.

येणे प्रमाणे लिपीक व प्र.मुख्य लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत 'अ'नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, आस्थापना विभागाच्या प्रस्तावित मुदतवाढीच्या प्रस्तावाबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, ,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५ "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी" असे नमुद केले आहे.

प्रस्तावित वैद्यकीय अधिकारी या पदी मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसार मा.स्थायी समितीकडे निर्णयार्थ पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी डॉ. सौ. रेणुका प्रणव जोशी यांची यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.राहुल कांबळे :- विषय क्र.४६ ते ५३ या विषयाचे ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावेत.

मा.श्री.संपत बारस्करः- मानधनावरील कर्मचा-यांचे पुर्ननियुक्तीचे विषय असल्याने मंजुर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी डॉ. सौ. रेणुका प्रणव जोशी यांची यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्र.४६ ते ५३ विविध विभागाच्या मानधनावरील कर्मचा-यांच्या पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी डॉ. सौ. रेणुका प्रणव जोशी यांची यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्र.४६ ते ५३ विविध विभागाच्या मानधनावरील कर्मचा-यांच्या पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजुर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.राहुल कांबळे - सही/-

अनुमोदकः- मा.श्री.संपत बारस्कर- सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

**विषय क्रमांक - ४७** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

संदर्भ : प्र. वैद्यकिय अधिक्षक, कै.बा.दे.दवा. यांचेकडील जा. क्र. २५ दि. १७ / ०४ / २०२३ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र. वैद्यकिय अधिक्षक, कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचेकडील जा. क्र. २५ दि. १७/०४/२०२३ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. ०७/१२/२०२२ ते ०६/०६/२०२३ अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि. ०७/०६/२०२३ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा. क्र. ३९१ दि. २१ / ०९ / २०२२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. ११२ दिनांक २१/११/२०२२ अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ४२७९ दि. १४/१२/२०२२ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची रु. ११,४४०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. ०७/१२/२०२२ पासुन सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे, सदर नियुक्तीची मुदत ही दि. ०७/०६/२०२३ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची पुढील सहा महिन्यांकरिता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ११,४४०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे बाबत निर्णय झाल्यास उक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./'अ'.

येणे प्रमाणे लिपीक व प्र.मुख्य लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत 'अ'नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, आस्थापना विभागाच्या प्रस्तावाबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५ "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी" असे नमुद केले आहे.

प्रस्तावित परिचारीका या पदी मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसार निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चाः-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.राहुल कांबळे :- विषय क्र.४६ ते ५३ या विषयाचे ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावेत.

मा.श्री.संपत बारस्करः- मानधनावरील कर्मचा-यांचे पुर्ननियुक्तीचे विषय असल्याने मंजुर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्र.४६ ते ५३ विविध विभागाच्या मानधनावरील कर्मचा-यांच्या पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्र.४६ ते ५३ विविध विभागाच्या मानधनावरील कर्मचा-यांच्या पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजुर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.राहुल कांबळे - सही/-

अनुमोदकः- मा.श्री.संपत बारस्कर- सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

---

**विषय क्रमांक - ४८** **दिनांक- ०४ /०७/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील नेमलेल्या सेवानिवृत्त अभियंता विजयशंकर तिवारी यांना तीन दिवसांचा तांत्रिक कालखंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभाग.

संदर्भ- १) मा.स्थायी समिती सभा क्र.०९ ठराव क्र.९५ दि.२७/०९/२०२२.

२) विद्युत विभाग जा.क्र.६८९ दि.२७/०२/२०२३ अन्वये कार्यादेश.

३) श्री.तिवारी व्ही.एस. यांचे दि.०३/०४/२०२३ रोजीचे मुदतवाढ मिळणेबाबतचे मागणी पत्र.

४) मा.महापौर यांचे कार्यालय जा.क्र.२३ दि.२४/०४/२०२३ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकच्या विद्युत विभागाकरीता कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या वरील संदर्भ क्र.२ अन्वये **सेवानिवृत्त अभियंता विजयशंकर तिवारी** यांना सहा महिन्याकरीता कार्यालयीन आदेश दिलेला होता. सदरची मुदत दि.१२/०२/२०२३ रोजी समाप्त होत आहे.

